**MHKO030072732022**

**कोल्हापूर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात,**
**न्यायालय क्रमांक १०, कोल्हापूर.**
**(पिठासीन अधिकारी विनया वि. गिराम )**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.४७१७/२०२२**

**निशाणी क्र. ६/क सोबत**

## न्यायनिर्णय

**(घोषित दिनांक १०/०९/२०२४)**

प्रस्तुत प्रकरणातील सारांश तसेच अभिलेखावर दाखल पुरावा व कागदपत्रे तसेच दोन्ही वकिलांचा युक्तीवाद यांचा विचार करता खालील मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दयावरील निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे दिले आहेत–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनाकं १४/०७/२०२२ रोजी दुपारी १.४० वाजणेच्या सुमारास विक्रमनगर, जोशी गल्ली, कोल्हापूर येथे एका पत्र्याच्या शेडमध्ये एका प्लॅस्टीकच्या कॅनमध्ये अंदाजे २० लिटर गावठी हातभट्टीची दारु, एक प्लॅस्टीकचा मग व पाच काचेचे ग्लास असा मुद्देमाल आपले जवळ बेकायदा, बिगर परवाना विक्री करणेच्या उद्देशाने बाळगलेला असताना आढळून आल्याने त्याने महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम कलम ६५–ई प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| २. | आदेश काय? | आरोपीची निर्दोष मुक्तता करणेत येते. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्रमांक १ बाबत –

२. अभियोग पक्षाने उपरोक्त सादर केलेल्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे गुणदोषावर अवलोकन करण्यापूर्वी प्रामुख्याने नमुद करावे लागेल की, प्रचलित न्याय तत्त्व प्रणालीनुसार आरोपीचे अपराधाचे कृत्य शाबीत करण्याची सर्वस्वी जबाबदारी ही अभियोग पक्षाची असते. सदरची जबाबदारी अभियोग पक्षाने बचावातील त्रुटी, विसंगती व खोटे पणाचा आधार न घेता सबळ विश्वासार्ह तोंडी व कागदोपत्री पुराव्याने निःसंशयपणे व निर्विवादपणे सिध्द करावयाचे असते. अभियोग पक्ष स्वतः ही जबाबदारी पार पाडत नाही, तो पर्यंत आरोपी हा कायद्याच्या कक्षेत निष्पाप समजला जातो. आरोपीच्या बचावातील कमकुवतपणाचा फायदा अभियोग पक्षास घेता येणार नाही. जरी आरोपीने आपला बचाव निःसंशयरित्या शाबीत केला नाही. तरी त्या कारणावरुन त्यास शिक्षा देता येणार नाही. आरोपी आपला बचाव अशक्यतेवर दाखवून देऊ शकतो. जर अभियोग पक्षाच्या खटल्याबाबत संशय निर्माण झाला तर संशयाचा फायदा आरोपीस दिला गेला पाहिजे. तसेच उपलब्ध पुराव्यावरुन दोन परस्पर मते निर्माण होत असतील तर आरोपीच्या बाजूने झुकणारे मत अंगीकारले पाहिजे अशी कायद्याची व्यापक संकल्पना आहे.

३. प्रामुख्याने या ठिकाणी नमुद करावे लागेल की, आरोपीवरील दोषारोप शाबीत करणेसाठी अभियोग पक्षास, आरोपीच्या ताब्यातून परवाना नसताना गावठी हातभट्टीची दारु मिळून आली हा अंतर्भूत घटक सिध्द करावा लागेल.

४. आरोपीवरील दोषारोप शाबीत करणेसाठी सरकार पक्षाने एकच साक्षीदार तपासलेला आहे. सदर प्रकरणामध्ये वारंवार साक्षीसमन्स काढून ही

अभियोग पक्षाने साक्षीदारांना हजर ठेवलेले नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणामध्ये अभियोग पक्षाने रासायनिक विश्लेषणाचा अहवाल दाखल केलेला नाही. त्यामुळे, अभियोग पक्षाचा पुरावा नि.क्र. १ वरील आदेशा अन्वये बंद करणेत आला आहे.

५. साक्षीदार क्रमांक १ जप्ती व घटनास्थळ पंच हंबीरराव यांची साक्ष निशाणी क्र.६ कडे नोंदविली. त्यांनी त्यांच्या जबाबात पोलिसांनी त्यांची तयार पंचनामेवर सही घेतल्याचे सांगितले आहे. परंतु पंचनाम्यातील मजकुराबाबत कोणतीही माहिती नसल्याचे सांगितले आहे. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाचे कथनास पुष्टी दिलेली नाही. अभियोग पक्षाने त्यास उलटतपासाच्या स्वरुपामध्ये प्रश्न विचारले असता त्याचेकडून कोणतीही महत्त्वाची कबुली मिळविण्यात त्यांना यश प्राप्त झालेले नाही. त्यामुळे आरोपीचे ताब्यातून कथित तारखेस व ठिकाणी गावठी हातभट्टीची दारु जप्त केलेबाबत शंका निर्माण होते. त्यामुळे, त्याची साक्ष विश्वासार्ह वाटत नाही.

६. तसेच अभियोग पक्षाला पुरेशी संधी देऊन ही अभियोग पक्षाने प्रस्तुत कामातील दुसरा पंच व इतर साक्षीदारांची साक्ष नोंदविलेली नाही.

७. अभियोग पक्षाचे कथनानुसार आरोपीच्या ताब्यातून एका प्लॅस्टीकच्या कॅनमध्ये अंदाजे २० लिटर गावठी हातभट्टीची दारु, एक प्लॅस्टीकचा मग व पाच काचेचे ग्लास जप्त केले व जप्त केलेल्या दारुतुन नमुन्याकरीता १८० मि.ली.च्या दोन बाटल्या घेतल्या होत्या व ती दारु रासायनिक पृथःकरणासाठी पाठविणेत आली होती. परंतु या कामी रासायनिक पृथःकरणाच्या अहवालाबाबत कोणताही पुरावा आणलेला नाही. त्यामुळे आरोपीच्या ताब्यातून काही मुद्देमाल जप्त करणेत आलेला होता व जप्त करणेत आलेल्या मुद्देमालात गावठी हातभट्टीची दारु होती हे निःसंशयपणे सिध्द होत नाही. सबब, मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्रमांक २ बाबत –**

८. अभियोग पक्षास आरोपीने गुन्हा केलेचे सिध्द करता आलेले नाही. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे. आरोपीने जप्त मुद्देमाल त्याचा असल्याचे नाकारले आहे. त्यामुळे सदर मुद्देमालाची अपिल कालावधीनंतर विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. सबब, मुद्दा क्रमांक २ चे उत्तराकरीता मी खालील आदेश पारीत करते.

**आदेश**

१. आरोपी **सचिन बाबुजी मछले** याची महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम कलम ६५–ई अन्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम, २५५ (१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचा वैयक्तिक जातमुचलका व जामीन कदबा रद्द करणेत येत आहे.

३. प्रस्तुत कामातील जप्त मुद्देमाल एक प्लॅस्टीकचा कॅन व त्यामधील अंदाजे २० लिटर गावठी हातभट्टीची दारु, एक प्लॅस्टीकचा मग व पाच काचेचे ग्लास यांची अपिल कालावधी संपलेनंतर नियमानुसार विल्हेवाट लावण्यात यावी.

४. आरोपीला असा आदेश देणेत येतो की, त्याने फौ.प्र.सं.क.४३७ (अ) चे तरतुदीची पुर्तता करणेसाठी रुपये १५,०००/– चे बंधपत्र व जामीनपत्र पुढील सहा महिन्याचे कालावधीकरिता देणेत यावा. (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात सांगुन जाहीर करण्यात आला.)

Digitally signed by VINAYA VISHWANATH GIRAM
Date: 2024.09.10 15:25:29 +0530

कोल्हापूर.

दिनांक – १०/०९/२०२४. (विनया वि. गिराम )

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,न्यायालय क्र.१०,कोल्हापूर.

**भाग – क**

## क्रिमीनल मॅन्युअल, प्रकरण सहा, पॅरा नं. ४४ (iii) प्रमाणे

## अभियोग पक्ष/ बचाव पक्ष / न्यायालयीन साक्षीदारांची यादी

अभियोग पक्षातर्फे घेतलेल्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्रमांक | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | हंबीरराव भाऊसो संकपाळ | ०६ | पंच |

ब) बचावपक्षाच्या साक्षीदारांची यादीः– निरंक

क) न्यायालयीन साक्षीदारांची यादीः– निरंक

### अभियोग पक्षातर्फे सिध्द केलेले दस्तऐवज

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १ | ०७ | पंचनामेवरील सही |

ब) बचावपक्ष निशाणीः– निरंक

क) न्यायालय निशाणीः–

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| | – | – |

ड) भौतिक वस्तूः–

| अ.क्रं. | मुद्देमाल आर्टीकल नं. | वर्णन |
|---|---|---|
| | — | –– |

Digitally signed by VINAYA VISHWANATH GIRAM
Date: 2024.09.10 15:25:36 +0530

कोल्हापूर.

दिनांक – १०/०९/२०२४.

(विनया वि. गिराम )

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

न्यायालय क्र.१०, कोल्हापूर.